# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## वित्त व लेखा विभाग

## परिपत्रक

शासनमान्य पदांवरील शिक्षक-शिक्षकेतर सेवकांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, अर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०२१-२२ च्या भविष्य निर्वाह निधी (GPF), वर्गणीच्या हिशोबांचे तक्ते व विद्यापीठ निधीतील शिक्षक-शिक्षकेतर सेवकांचे अंशदायी भविष्य निर्वाह निधी (CPF) वर्गणीच्या हिशोबांचे तक्ते तसेच शासनमान्य पदांवरील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचे परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेतील (DCPS) वर्गणीच्या हिशोबांचे तक्ते भ.नि.नि. कक्षामार्फत विद्यापीठ स्तरावर तयार करण्यात आलेले आहेत. सदर तक्ते विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील (HR System) मध्ये आपल्या LOGIN ला दिनांक ०१/०९/२०२२ पासून पहावयास मिळतील. सदर हिशोब तक्त्यांमध्ये सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम व पी.एफ.फरकाची रक्कम वगळून निव्वळ सेवकाची वर्गणी व विद्यापीठाचा हिस्सा निर्देशीत करण्यात आलेला आहे. सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या व पी.एफ. फरकाच्या हिशोब तक्त्यांचे काम सध्या चालू असून सदर हिशोब पूर्ण झाल्यावर सेवकाच्या LOGIN ला पहावयास मिळतील.

सदर हिशोब तक्त्यांबाबत आपल्या काही हरकती असल्यास आपण दिनांक २०/०९/२०२२ पर्यंत भविष्य निर्वाह निधी कक्षाकडे संपर्क साधावा.

टिप : भविष्य निर्वाह निधी वर्गणी (GPF) व परिभाषीत अंशदायी निवृत्तीवेतन योजनेतील (DCPS) वर्गणीचे तक्त्यांचे अद्याप शासनाकडून लेखापरिक्षण होणे बाकी आहे.

सीएमए चारुशीला आर. गायके
वित्त व लेखा अधिकारी

गणेशखिंड, पुणे ४११००७
जावक क्र. वित्त /भनिनि/२०२२-२३/461
दिनांक ०१/०९/२०२२

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१) मा. विभागप्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ )

२) मा. शाखाप्रमुख,
सर्व प्रशासकीय शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ )

यांना विनंती करण्यात येते की, आपल्या विभागातील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास सदरचे परिपत्रक आणावे.

C:\Users\bramhe\Desktop\Marathi Letter PF Section.doc